दिनांक :- १६/०८/२०२४

## पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

**पोलीस भरती २०२२-२०२३**
**वाहन चालक कौशल्य चाचणी वेळापत्रक**

पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक पदाच्या वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीस पात्र ठरलेल्या एकुण ४०२५ उमेदवारांची वाहन चालक कौशल्य चाचणी दि.१३/०८/२०२४ पासुन घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने **दि.२०/०८/२०२४ ते २९/०८/२०२४ या कालावधीतील एकुण २९२५ उमेदवारांच्या वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.** सदर वेळापत्रकामध्ये नमूद चेस्ट क्रमांकाचे उमेदवारांनी त्यांचे चेस्ट क्रमांका समोरील दिनांकास **पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे** या ठिकाणी सकाळी ०५.३० वाजता वाहन चालक कौशल्य चाचणीकरीता बिनचुक उपस्थित रहावे.

| अ.क्र. | दिनांक व वेळ | चेस्ट क्रमांक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९/०८/२०२४ (सोमवार) सकाळी ०५-३० वाजता | ४१७७ ते ५२०६ | ३०० |
| २ | २०/०८/२०२४ (मंगळवार) सकाळी ०५-३० वाजता | ५२०७ ते ६२९१ | ३०० |
| ३ | २१/०८/२०२४ (बुधवार) सकाळी ०५-३० वाजता | ६३०४ ते ७५३५ | ३०० |
| ४ | २२/०८/२०२४ (गुरुवार) सकाळी ०५-३० वाजता | ७५३९ ते ८६१३ | ३०० |
| ५ | २३/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळी ०५-३० वाजता | ८६१६ ते ९८८४ | ३०० |
| ६ | २४/०८/२०२४ (शनिवार) सकाळी ०५-३० वाजता | ९८८७ ते १०५७६ | ३०० |
| ७ | २६/०८/२०२४ (सोमवार) सकाळी ०५-३० वाजता | १०५७८ ते १०९३६ | ३०० |
| ८ | २७/०८/२०२४ (मंगळवार) सकाळी ०५-३० वाजता | १०९३८ ते ११३०३ | ३०० |
| ९ | २८/०८/२०२४ (बुधवार) सकाळी ०५-३० वाजता | ११३०४ ते ११६६३ | ३०० |
| १० | २९/०८/२०२४ (गुरुवार) सकाळी ०५-३० वाजता | ११६६४ ते ११९३८ | २२५ |

**उमेदवारांकरीता सुचना :-**

१. उमेदवारांनी वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीसाठी येतांना मैदानी चाचणीकरीता महा-आयटीकडुन देण्यात आलेल्या प्रवेशपत्राची प्रत, या कार्यालयाकडील ओळखपत्र, वाहन चालविण्याचा मुळ परवाना, आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तसेच ०८ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावे. सदर कागदपत्रे न आणल्यास कौशल्य चाचणीकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

२. वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी एकुण ५० गुणांची असुन सदर चाचणी खालीलप्रमाणे ०२ प्रकारामध्ये घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) हलके वाहन चालविण्याची चाचणी | - | २५ गुण |
| ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी | - | २५ गुण |

उमेदवारांना सदर चाचणीमध्ये ४०% गुण मिळवुन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जे उमेदवार ४०% गुण मिळवुन उत्तीर्ण होतील. ते उमेदवार लेखी परीक्षेकरीता पात्र ठरतील. तसेच कौशल्य चाचणी ही केवळ अर्हता चाचणी असुन सदर चाचणीमध्ये मिळालेले गुण हे गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणामध्ये समाविष्ट केले जाणार नाहीत. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. जे उमेदवार उपरोक्त नमुद वेळापत्रकानुसार त्यांना नेमुन दिलेल्या तारखेस कौशल्य चाचणीकरीता उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत तारीख बदलून मिळणार नाही, याची नोंद घ्यावी. उमेदवारांना काही अडचण असल्यास estt3.pco.pune@nic.in या वेबसाईटवर मेल करावा.

**( डॉ. राजकुमार शिंदे )**
**पोलीस उप-आयुक्त,**
**तथा सदस्य, पोलीस भरती निवड मंडळ,**
**पुणे शहर**